# योजनेचे नाव :- शासकिय रोपवाटिकेचे बळकटीकरण

**योजनेचे स्वरुप :-**

राज्यातील ३४ जिल्हयांत १३६ शासकिय रोपवाटिका कार्यरत आहेत. फळांच्या उत्कृष्ट बागा स्थापन करण्यासाठी या फळरोपवाटिकांवर जातीवंत व गुणवान कलमा/रोपांची निर्मिती केली जाते. याकरीता विविध जातीवंत मातृवृक्ष लागवड व जतन करणेत येते. सदर कलमा/रोपांचे गुणवत्ता नियंत्रणासाठी राज्यातील रोपवाटिकांची विभागीय समितीमार्फत रोगमुक्त कलमांची तपासणी केली जाते. या योजनेत जनजाती क्षेत्रातील शेतकऱ्यांना फलोत्पादन विकास योजनेत समाविष्ट करुन घेण्यात येते.

**योजनेचे प्रमुख उददेश / वैशिष्टये :-**

१. फळांच्या उत्कृष्ट बागा स्थापन करण्यासाठी जातीवंत व गुणवान कलमा / रोपांचा पुरवठा होण्यासाठी विविध जातीवंत मातृवृक्ष लागवड करणे.
२. मातृवृक्षापासून तयार केलेली कलमे/रोपे फलोत्पादन विकास कामासाठी विविध योजानांद्वारे गरजू शेतकऱ्यांना शासनमान्य दराने उपलब्ध करुन देणे व फळविकास करणे.
३. भाजीपाला, फुलपिके, औषधी व सुगंधी वनस्पती यांच्या लागवड साहित्याचा पुरवठा करण्यासाठी शासकीय रोपवाटिकेवर विविध कार्यक्रम घेणे आणि जनजाती क्षेत्रातील शेतकऱ्यांना फलोत्पादन विकास योजनेत समाविष्ट करुन घेणेसाठी फळरोपवाटीकेवरुन कलमे/रोपे पुरविणे हे आहे.
४. आदिवासी क्षेत्रामध्ये रोपवाटिकेची स्थापना करणे.

या योजनेंतर्गत फलोत्पादन विकास कामासाठी शेतक-यांना फळझाडांची जातीवंत व गुणवान सदर कलमे/रोपे शासनमान्य दराने उपलब्ध करुन दिली जातात. तसेच या योजनेत जनजाती क्षेत्रातील शेतकऱ्यांना फलोत्पादन विकास योजनेत समाविष्ट करुन घेण्यात येते.

**योजनेतील घटक :**

सदर योजना डीपीडीसी मार्फ़त राबविली जात असून सन २०१६-१७ मध्ये डिपीडीसी अंतर्गत सर्वसाधारण घटकासाठी रु.१३.२१ कोटी ( साहित्य सामुग्री पुरवठा / गौण बांधकामे / सहायक अनुदाने / यंत्र सामुग्री व साधन सामुग्री / अर्थसहाय्य या बाबींकरीता ) व आदिवासी उपयोजनेअंतर्गत रु. १.६८ कोटी ( साधन सामुग्री या बाबीकरीता ) अशी एकुण रु. १४.८९ कोटी निधीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच मजूरी या घटकाअंतर्गत रु.५.०३ कोटी निधीची तरतूद राज्य स्तरावरून करण्यात आलेली आहे.

**केंद्र / राज हिस्सा प्रमाण :-**

सदर योजना डीपीडीसी मार्फ़त राबविली जात असून योजनेसाठी १०० टक्के अनुदान जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध होते.

**योजनेखाली व्याप्त होणारे क्षेत्र / लाभार्थी संख्या :-**

सदर योजनेतून रोहयो / मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवडीस आवश्यक कलमे /रोपे उपलब्ध करून दिली जात असल्याने या योजनेंतर्गत स्वतंत्र क्षेत्र / लाभार्थी येत नाहीत.

**योजनेचा मंजूर कार्यक्रम उपलब्ध निधी व खर्च :**

-

सदर योजना डीपीडीसी मार्फ़त राबविली जात असून डिपीडीसी अंतर्गत रु. १४.६९ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. सन २०१६-१७ मध्ये डिपीडीसी अंतर्गत सर्वसाधारण घटकासाठी रु.१३.०१ कोटी व आदिवासी उपयोजनेअंतर्गत रु. १.६८ कोटी अशी एकुण रु. १४.६९ कोटी निधीची तरतुद करण्यात आली आहे. यापैकी अनुक्रमे रु. १.०९ कोटी व रु. ०.०२ कोटी निधी वितरीत झाला असून खर्च झाला आहे.

मजूरी या घटकाअंतर्गत रु.५.०३ कोटी निधीची तरतूद राज्य स्तरावरून करण्यात आली असून रु. ३.८४ कोटी निधी वितरीत झाला असून रू. १.९७ कोटी खर्च झाला आहे

**योजनेची अंमलबजावणीतील अडचणी व उपाययोजना :**

१. शासकीय रोपवाटिकांवर पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्याने रोपवाटिकांचे कामावर विपरीत परीणाम होतो.
२. रोहयो अंर्तगत फळबाग लागवडीचे उददीष्ट मर्यादित असल्याने कलमे/रोपे निर्मितीवर मर्यादा येतात.
३. मनरेगा अंतर्गत फक्त रोपांची निर्मिती होत आल्याने त्यांचे उचलीवर मर्यादा येतात.
४. रोपवाटिका शहरालगत आल्याने अकृषिक वापरासाठी तेथील जमीनीस मागणी केली जाते.
५. शासकिय रोपवाटिकांवरील कंत्राटी कामगारांना शासनसेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याची मागणी केली जाते.

**योजनेची अंमलबजावणीची कार्यपदधती :**

शासकीय रोपवाटिका बळकटीकरणाचे योजनेअंतर्गत साहित्य सामुग्री पुरवठा व गौण बांधकामे या बाबीकरीता प्रामुख्याने अर्थसहाय्य दिले जाते. सदर योजनेअंतर्गत रोपवाटिकेवर पायाभूत सुविधा उभारणे, आवश्यक असलेल्या मातृवृक्षांची लागवड करणे, रोपवाटिकांच्या संरक्षणासाठी सीमाभिंत बांधणे, पाण्याची सुविधा उपलब्ध करुन घेणे, पॉलीहाऊस, शेडनेट, हार्डनिंग शेड, ग्रीन हाऊस, इ. सुविधा तयार करण्यासाठी निधी दिला जातो. शासनाचे सुचनेनुसार सन २०१३-१४ पासुन सदर योजना डीपीडीसी मार्फ़त राबविली जाते. सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेमार्फत केली जाते.